दिवाणी दावा नंबर १३७/२०१५

**<u>वादीतर्फे सा.क्रं.१</u>** निशाणी क्रं. ३२ लगत

मी, मालती बाळगोंडा पाटील, सरतपासाचे शपथपत्र दिले असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री सी.ए.कुलकर्णी यांच्या वतीने</u>.....

१. हे म्हणणे खरे आहे की मुळ दावा मिळकत ही बाळगोंडा पाटील यांची आहे व ते मयत आहेत. मयत बाळगोंडा यांना मी पत्नी या नात्याने, तसेच मुलगा श्रेणिक व मुली आरती व ज्योती असे वारस आहोत. हे म्हणणे खरे नाही की सर्व वारसांची दावा मिळकतीत वहिवाट आहे. दावा मिळकतींचे माझ्या मुलांमध्ये व माझ्यामध्ये वाटणीपत्र झाले, याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. तो दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की घरगुती व्यवस्थापत्र माझे पती बाळगोंडा यांनी करुन ठेवले नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादीनंबर १ ते ७ यांची गट नंबर ७६७ ही वडिलार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नंबर ७६७ व त्यावरील बांध ही प्रतिवादींची वडिलार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादींची जमीन पश्चिमेस व माझी जमीन पुर्वेस आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीच्या पुर्वेकडुन पश्चिमेकडे चढ आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींची जमीन ही माझ्या जमिनीपेक्षा पाच फुट उंचावर आहे. हे म्हणणे खरे आहे की वादी व प्रतिवादींच्या जमिनीच्या मध्ये दक्षिणोत्तर चालीचा ५०० ते ६०० फुट लांबीचा व तीन फुट उंचीचा बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर बांध हा प्रतिवादींचा पुर्वापार असा बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नंबर ७६७ च्या मध्ये पुर्व बाजुस द्राक्षबाग आहे. सदरची बाग ही आठ ते नउ वर्षापासुन आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर बागेचे स्टे हे सदर बांधावर आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की या कोर्टात यापुर्वी मी भिमराव बिरु शेजाळ व

इतर १९ याच्याविरुध्द दिवाणी दावा क्रमांक १४६/२०१२ हा अतिक्रमणासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये अति तातडी मोजणी नंबर ११९२ दिनांक २५.०१.२०१० रोजी मोजणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मोजणीचा नकाशा मी दावा नंबर १४६/२०१२ मध्ये दाखल केलेला आहे व तो माझ्या म्हणण्याप्रमाणे बरोबर आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की वादी व प्रतिवादी यांच्यामधील बांधावर नारळाची व लिंबाची झाडे आहेत. मी गट नंबर ७६० बाबतचे उतारे व नकाशे पाहिलेले आहेत. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडील अभिलेखामध्ये गट नंबर ७६० च्या पश्चिम बाजुस बांध आहे किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की अभिलेखामध्ये गट नंबर ७६० व ७६७ यांची हद्द सरळ रेषेत दाखवलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी नंबर १ यांनी हद्दीचा वाद होवु नये याकरिता मो.र.नंबर २००८ अन्वयेची मोजणी दिनांक २९.०४.२०१४ रोजी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी गट नंबर ७६० ची मोजणी झालेली नाही.

५. वादी नंबर २ ज्योती बाळगोंडा पाटील या भुमी अभिलेख कार्यालयात नोकरीस आहेत. हे म्हणणे खरे नाही की वादी नंबर २ यांनी प्रतिवादींच्या पुर्वेकडील बांधावरुन चुकीची वहिवाट दाखवण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की मोजणी व त्यानंतरचा नकाशा हा चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नंबर ७६० च्या मोजणीमध्ये जे बांधपड दाखवलेले आहे, ते माझे नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्ही बांधावर अतिक्रमण करुन खड्डे पाडुन हरकत करु लागलो जेणेकरुन प्रतिवादींच्या द्राक्षबागेतील सुपिक माती व खत आमच्याकडे वाहुन येईल. हे म्हणणे खरे आहे की माझी जमीन मुरमाड असल्याने त्यामध्ये मी डाळींबाची बाग लावलेली आहे. प्रतिवादींनी द्राक्षबाग लावतांना जमिनीमध्ये माती व खते घातलेली आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. प्रतिवादींच्या जमिनीची प्रतवारी मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींनी त्याचा बांध ढासळु नका, असे सांगितल्याने आम्ही

त्याबाबतचा राग मनात धरुन प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. भुमी अभिलेखाच्या अभिलेखाप्रमाणे माझ्या जमिनीच्या उत्तरेस बांधपड आहे, दक्षिणेस नाही. हा दावा दाखल करण्यापुर्वी गट नंबर ७६० ची मोजणी केलेली आहे. त्या मोजणीबाबतचा नकाशा माझ्याकडे आहे. तो न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. गट नंबर ७६० व ७६७ हे एकाच वेळी मोजले, असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की डाळींब लावण्यापुर्वी तालुका भुमी अभिलेख कार्यालयाकडुन मोजणी र.नं.१९९२ दिनांक २५.०१.२०१० रोजी मोजणी करुन घेतली आहे व त्यावेळी आम्ही वादी–प्रतिवादी हजर होतो. तो नकाशा माझ्याकडे उपलब्ध आहे व तो मी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर मोजणीमध्ये गट नंबर ७६० च्या पश्चिमेस बांध दाखवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादींनी आमच्या पिकांचे नुकसान केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी यांनी आमच्या गट नंबर ७६० मध्ये येवुन हरकत केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींची जमीन ही चढावर असल्याने आम्हीच पुर्वेकडुन बांधाची टोकरा–टोकरी करुन त्याची माती डाळींबाच्या बागेत टाकतो व आमचे क्षेत्र वाढवतो. सध्या आमची डाळींब बाग नाही परंतु द्राक्षबाग आहे. हे म्हणणे खरे आहे की कोणतीही अडचण होवु नये यासाठी पश्चिमेकडुन चार फुटावर द्राक्षबाग केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपास प्रतिज्ञापत्रामधील सर्व मजकुर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी हे माझे भाउबंद आहेत. हे म्हणणे खरे आहे की आमच्यात बोलणे–चालणे नाही. हे म्हणणे खरे नाही की भाउबंदकीतुन त्रास देण्यासाठी सदरचा खोटा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृती.

Shrinivas Arun Kulkarni
Digitally signed by Shrinivas Arun Kulkarni
Date: 2019.08.08 17:06:49 +0530

दिनांक ०८.०८.२०१९

(श्रीनिवास अ.कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कवठेमहांकाळ.

कवठेमहांकाळ.